# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे का.क.७७ अ अन्वये आदेश

जा.क्रं./ ८५५ /उनिमि/का.क.७७ अ आदेश/सन-२०१७
उपनिबंधक, सहकारी संस्था, मिरज यांचे कार्यालय,
दिनांक:- २१ /०७/२०१७

**वाचले :-**

१ ) श्री.डी. पी. काळे, सहकारी अधिकारी श्रेणी - १ यांचा दि.२३/०५/२०१७ रोजीचा अहवाल.
२) या कार्यालयाकडील जा.क्र.उनिमि दि.३१/१/२०१७ रोजीची नोटीस.
३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे का.क. ७७ अ (ब-१) मधील तरतुद

---

ज्याअर्थी, महालक्ष्मी सहकारी मालकी गृहनिर्माण संस्था मर्या.,सांगली ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कायदयातील तरतुदीनुसार नोंदविणेत आलेली सहकारी संस्था असुन सदर संस्था या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात व अधिकार कक्षेत येते. (यापुढे सदर संस्थेच्या नावाचा उल्लेख संस्था असा करणेत येईल)

ज्याअर्थी, वाचले क्र.१ अन्वये या कार्यालयाचे श्री.डी. पी. काळे, सहकारी अधिकारी श्रेणी - १ यांनी या कार्यालयास श्री.दत्तात्रय बाबूराव घाडगे व इतर १७ यांचे प्राप्त तक्रार अजाची चौकशी करुन अहवाल सादर केला आहे. संस्थेच्या उपविधीतील तरतुदीनुसार संस्थेची व्यवस्थापक समिती **११** संचालकांची असुन त्यापैकी १० संचालक व्यवस्थापक समितीवर निवडुन आलेले आहेत. त्यापैकी वर नमुद ५ संचालकांची संचालक पदे वेगवेगळया कारणास्तव रिक्त झाली असुन सध्या ५ संचालक व्यवस्थापक समितीवर कार्यरत असलेचे चौकशी अहवालावरुन निदर्शनास येत असलेने संचालक मंडळ सभेचा कोरम पुर्ण होणेसाठी ६ संचालक व्यवस्थापक समितीवर कार्यरत असने आवश्यक आहे.

ज्याअर्थी, सध्या संस्थेची कार्यरत संचालक मंडळ संख्या अल्पमतात असलेने गणपुर्ती अभावी संचालक मंडळ सभा पुर्ण होऊ शकत नसलेचे स्पष्ट होते.तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब-१) मधील तरतुदीनुसार संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती का करणेत येवू नये याबाबत म्हणणे मांडणेकरिता वाचले क्र. २ चे नोटीशीने दि.३०/०६/२०१७ रोजी सुनावणी घेणेत आली. सूनावणी तारखेस जाबदार १ ते ५ यांचे तर्फे ॲड.श्री.नितीन बी कोळेकर यांनी वकीलपत्र दाखल केले व पुढील तारीख मिळणेबाबत लेखी अर्ज दाखल केलेने पुढील सुनावणी तारीख ०४/०७/२०१७ रोजी ठेवणेत आली. दि.०४/०७/२०१७ रोजी जाबदार १ ते ५ तर्फे ॲड.श्री.नितीन बी कोळेकर सुनावणीस हजर राहीले नाहीत अथवा त्यांनी सुनावणी तारखेपुर्वी कोणतेही लेखी म्हणणे दाखल केले नाही

ज्याअर्थी, कार्यरत संचालकांची संख्या ५ असलेने संस्थेच्या उपविधीतील तरतुदीनुसार गणपुर्ती अभावी संस्थेचे कामकाज पार पाडले जाऊ शकणार नसलेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब-१) मधील तरतुदीनुसार संस्थेचे सर्व संचालक मंडळ बरखास्त करुन त्या जागी प्राधिकृत अधिकारी मंडळाची नियुक्ती संस्थेवर करणे क्रमप्राप्त ठरते.

ज्याअर्थी, जाबदार क्र.१ ते ५ यांचे वतीने ॲड. श्री.नितीन बी. कोळेकर यांनी नेमले सुनावणी तारखेस कोणत्या प्रकारचे लेखी म्हणणे सादर केले नसलेने व संस्थेच्या रचनेत निर्माण झालेला दोष त्या अनुषंगाने संस्थेचे कामकाज चालविणेच्या दृष्टीने संस्थेवर प्राधिकृत अधिकारी मंडळाची नियुक्ती करणे आवश्यक व गरजेचे आहे अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

SOCIETIES ... संस्था ... जिल्हा सांगली DIST. SANGLI

Scanned by CamScanner

# आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) (ब-१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरुन मी डॉ.प्र.अ.बागल, उपनिबंधक, सहकारी संस्था मिरज महालक्ष्मी सहकारी मालकी गृहनिर्माण संस्था मर्या., सांगली ता.मिरज जि.सांगली या संस्थेचे संचालक मंडळ बरखास्त करुन त्रिसदस्यीय प्राधिकृत अधिकारी मंडळाची खालीलप्रमाणे नियुक्ती करीत आहे.

१. श्री. यु. एस. मधाळे,प्राधिकृत अधिकारी मंडळ, अध्यक्ष, तथा, सहकारी अधिकारी श्रेणी-१, अधिन उपनिबंधक,सहकारी संस्था,मिरज
२. श्री. एस.बी.सोनवने,सदस्य तथा, मुख्यलिपीक, अधिन उपनिबंधक,सहकारी संस्था,मिरज
३. श्री. एस.एस.जमदाडे सदस्य तथा,सहाय्यक सहकारी अधिकारी अधिन उपनिबंधक,सहकारी संस्था, मिरज

प्राधिकृत अधिकारी मंडळाचा कालावधी ६ महिन्यांचा असून प्राधिकृत अधिकारी मंडळाने त्वरित दप्तरी चार्ज घेवून तसा चार्ज यादीसह अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश आज दिनांक २१/०७/२०१७ रोजी माझी सही व कार्यालयीन शिक्यानिशी दिला आहे.

DEPUTY REGISTRAR CO OP SOCIETIES, MIRAJ TALUKA, उप निबंधक, सहकारी संस्था, मिरज तालुका, जिल्हा सांगली, DIST SANGLI

ठिकाण-मिरज
दि.२१ /०७/२०१७

( डॉ.प्र.अ.बागल)
उपनिबंधक,
सहकारी संस्था,मिरज

प्रति,

१)चेअरमन/सचिव,
महालक्ष्मी सहकारी मालकी गृहनिर्माण संस्था मर्या.; सांगली ता.मिरज जि.सांगली

२/- आपणांस कळविणेत येते की, संस्थेचे सर्व दप्तर प्राधिकृत अधिकारी मंडळाचे ताब्यात देऊन चार्ज यादीसह अहवाल या कार्यालयास सादर करावा.

१. श्री. यु. एस. मधाळे,प्राधिकृत अधिकारी मंडळ, अध्यक्ष, तथा, सहकारी अधिकारी श्रेणी-१, अधिन उपनिबंधक,सहकारी संस्था,मिरज
२. श्री. एस.बी.सोनवने,सदस्य तथा, मुख्यलिपीक, अधिन उपनिबंधक,सहकारी संस्था,मिरज
३. श्री. एस.एस.जमदाडे सदस्य तथा,सहाय्यक सहकारी अधिकारी अधिन

२/- संस्थेचा दप्तरी व मालमत्तेचा ताबा घेवून चार्ज यादीसह अहवाल या कार्यालयास सादर करावे.

३) शाखाधिकारी, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा - मार्केट यार्ड, सांगली

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

३) मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,सांगली
४) मा.जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था सांगली

उपनिबंधक,
सहकारी संस्था,मिरज

जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, सांगली यांचे कार्यालय
26 JUL 2017
2806
क्र-3

28-7-2017

| मर्या/अधि, | स.नि.(१) | स.नि.(२) | जि.उ.नि. |
|---|---|---|---|

Scanned by CamScanner